अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## महापालिकेचे नगर अभियंता कोरोना पॉझिटिव्ह

**सोलापूर** : सोलापूर शहरात कोरोनाचे रुग्ण हळूहळू वाढत आहेत. दरम्यान, महापालिकेचे प्रभारी नगर अभियंता लक्ष्मण चलवादी यांना कोरोनाची लागण झाली आहे. नगर अभियंता चलवादी यांना सौम्य लक्षणे असल्याने त्यांची कोरोना चाचणी केली असता त्यांचा अहवाल पॉझिटिव्ह आला असल्याची माहिती महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे यांनी दिली.

सध्या लक्ष्मण चलवादी यांना गृहविलगीकरणात ठेवण्यात आले आहे. दरम्यान, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी यांच्या संपर्कातील लोकांची कोरोना चाचणी करण्यात येईल, असेही आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे यांनी स्पष्ट केले. चलवादी यांच्याकडे नगर अभियंता विभागाची महत्त्वाची जबाबदारी आहे. कामाच्या निमित्ताने विविध लोकांशी त्यांचा संपर्क असतो. त्यातूनच ही लागण झाली असल्याचे सांगण्यात आले. यापूर्वी देखील चलवादी यांना कोरोनाची लागण झाली होती. शहरात पुन्हा एकदा कोरोनाच्या



रुग्ण संख्येत वाढ होऊ लागली आहे. त्यातच एच३एन२ या संसर्गाचाही प्रादुर्भाव होत आहे. महापालिकेत लक्ष्मण चलवादी यांच्या माध्यमातून कोरोनाचा शिरकाव झाला आहे. त्यामुळे प्रशासन सतर्क झाले आहे. सोलापूर शहरात सध्या २८ रुग्ण कोरोना बाधीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यापैकी चार जणांवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उर्वरित २४ जण गृह विलगीकरणात असल्याचे डॉ. बसवराज लोहारे यांनी सांगितले.

www.surajyadigital.com | शनिवार, दि. १८ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १६८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# आमदारांची लक्षवेधी विद्यापीठातील भ्रष्टाचारावर; कुलगुरूंची चौकशी होणार निवृत्तीच्या उंबरठ्यावर

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**फक्त एकाच जिल्ह्यासाठी असणारे राज्यातील एकमेव विद्यापीठ म्हणजे सोलापूरचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ. या विद्यापीठातील भ्रष्टाचारावर माळशिरसचे आ.राम सातपुते यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी मांडत विद्यापीठाच्या भोंगळ कारभाराचा पाढा सभागृहात वाचला आहे. त्यानंतर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी उच्च पदस्थ अधिकाऱ्यांमार्फत कुलगुरू मृणालिनी फडणवीस यांच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. परिणामी सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असणाऱ्या कुलगुरूंना आता चौकशीला तोंड द्यावे लागणार आहे.**

कोविड काळातील ऑनलाईन पेपर तपासणी, क्रिडा स्पर्धेतील घोटाळा आणि कुलगुरूंकडून होणारा अधिकारांचा गैरवापर यावर माळशिरसचे भाजप आ. राम सातपुते यांनी शुक्रवारी विधानसभेत लक्षवेधी मांडली. पेपर तपासणीतील भ्रष्टाचाराचा आकडा कोट्यवधींवर गेल्यामुळे उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठाला खुलासा करण्याचा आदेश दिला होता. हा खुलासाही अमान्य झाल्यामुळे उच्च पदस्थ अधिकाऱ्यांमार्फत स्वतंत्र चौकशी करणार असल्याची माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सभागृहात दिली.



### दोषी आढळल्यास निवृत्तीचे लाभ रोखणार

दरम्यान, कुलगुरू फडणवीस ह्या दि. ५ मे रोजी सेवानिवृत्त होत आहेत. तत्पूर्वी देवळाणकर यांच्या अध्यक्षतेखालील समिती कुलगुरू फडणवीस यांची चौकशी करेल आणि दि. ३० एप्रिलपर्यंत अहवाल सादर करेल. या अहवालात कुलगुरू दोषी आढळल्यास त्यांच्या सेवानिवृत्तीचे लाभ रोखण्यात येतील, अशी घोषणा उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात केली आहे. त्यामुळे सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर कुलगुरूंना चौकशीला सामोरे जावे लागणार आहे.

### पेपर तपासणीत केला घोळ


कोविडच्या काळात विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आल्या. या परीक्षेतील पेपर तपासणीचे कंत्राट कुलगुरूंनी एका कंपनीला दिले. राज्यातील इतर विद्यापीठात ऑनलाईन पेपर तपासणीचा दर हा प्रती पेपर ८ ते १२ रुपये असताना कुलगुरूंनी प्रती पेपर ३५ रुपये दर दिला. याशिवाय विद्यापीठाने घेतलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतही गैरव्यवहार झाला असून विद्यापीठ कँटिनच्या कंत्राटातही घोटाळा असल्याचा आरोप आ. सातपुते यांनी केला आहे.

### ५ वर्षात ४० कोटींचा भ्रष्टाचार : आ.सातपुते

सोलापूर विद्यापीठात दरवर्षी ७० हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. एका वर्षाला ८ कोटी म्हणजे पाच वर्षाला ४० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे, असा आरोपी आ. सातपुते यांनी केला आहे. यासंदर्भात विद्यापीठाकडून माध्यमांकडे कोणताही खुलासा करण्यात आला नाही. याबाबत कुलगुरूंना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र संपर्क होऊ शकलेला नाही. त्यामुळे कुलगुरूंची बाजू समजू शकलेली नाही.

### देवळाणकर करणार चौकशी

दरम्यान, आ. सातपुते यांच्या लक्षवेधीनंतर उच्च शिक्षणमंत्र्यांनी विद्यापीठाकडून खुलासा मागवला. मात्र विद्यापीठाचा खुलासा आ. सातपुते यांचे समाधान करणार नव्हता. त्यामुळे त्यांनी हा विषय सभागृहात ताणून धरला. शेवटी उच्चशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या अध्यक्षतेखालील समिती कुलगुरूंची चौकशी करेल, अशी माहिती सभागृहात दिली.



## नदीपात्रातून अवैध वाळू उपसा; १४ लाखांचे साहित्य जप्त

**सोलापूर** : ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती येथील हरणा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या दोन डंपिंग ट्रेलर असलेल्या ट्रॅक्टरवर कारवाई एकूण १४ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी वळसंग पोलिसात आठजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शेकुंबर लल्लु नदाफ, नेताजी महादेव पवार, परमेश्वर मारुती पवार, रतन महिबुब नदाफ, मुबारक बशीर कोतवाल, मुत्तण्णा अंबाजी कोळी, नेताजी महादेव पवार, बालाजी महादेव पवार (सर्व रा. मुस्ती) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. मुस्ती येथील हरणा नदीच्या पात्रातून काही इसम डंपिंग ट्रेलर असलेल्या ट्रॅक्टरच्या सहाय्याने चोरून वाळू काढून त्याची विक्री करीत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने छापा टाकून ८ इसमांना ताब्यात घेतले. तेथून वाळूने भरलेल्या दोन डंपिंग ट्रेलरसह ट्रॅक्टरहेड असा एकूण १४ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे, सहायक फौजदार शिवाजी घोळवे, पोलीस अंमलदार बापू शिंदे, हरिदास पांढरे, मोहन मनसावाले, अनिस शेख, गणेश बांगर आदींनी केली आहे.

## शिरसी पुलावरुन उलटल्याने ट्रक पेटून एक ठार

सुराज्य/अक्कलकोट

शिरसी (ता.अक्कलकोट) येथील पुलावरून गुलबर्गा ते पुणे जाणारी सिमेंट ट्रक पलटी होऊन झालेल्या अपघातात एक जण ठार तर एक जण जखमी झाला. याची नोंद अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात झाली आहे. शुक्रवारी दुपारी ३.३० वाजण्याच्या दरम्यान गुलबर्गा ते पुणे सिमेंट भरून जाणारी ट्रक क्र.एम.एच.२५/यु/१३९९ ही गाडी चालक मल्लिनाथ कल्याणप्पा चालवत असताना ओढ्याच्या पुलावरील लोखंडी बॅरिकेटींगला जोरात धडक बसली.



यामध्ये ट्रक पलटी होऊन आग लागून चालकाच्या शेजारी बसलेला प्रभुलिंग यांचा होरपळून मृत्यू झाला. बसवराज बिराजदार जखमी झाले. ट्रक चालका विरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कांद्याच्या अनुदानात वाढ

- शेतकऱ्यांच्या लाँग मार्चचे मोठे यश

**मुंबई** : अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वात निघालेल्या लाँग मार्चला मोठे यश मिळाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी विधानसभेत निवेदन केले. कांद्याला देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३५० रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी केली. यापूर्वी हे अनुदान प्रतिक्विंटल तीनशे रूपये देवू केले होते.



आदिवासींच्या वनजमिनीच्या दाव्याबाबत तसेच शेतकऱ्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी एक समिती स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली.त्यात माजी आमदार जीवा पांडू गावित आणि आमदार विनोद निकोले यांचा समावेश असणार आहे. गुरुवारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर संबंधित मंत्र्यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा केली होती. त्यानंतर शिंदे यांनी सभागृहात चर्चेतील मागण्यांबाबत माहिती दिली. कसणाऱ्यांच्या ताब्यात असलेली ४ हेक्टर पर्यंतची वनजमीन कसणाऱ्यांच्या नावे करून ७/१२च्या कब्जेदार सदरी कसणाऱ्यांचे नाव लावा. सर्व जमीन कसण्यालायक आहे असा उताऱ्यावर शेरा मारा. अपात्र दावे मंजूर करा. गायरान, बेनामी, देवस्थान, इनाम, वक्फ बोर्ड, वरकस व आकारीपड जमिनी कसणाऱ्यांच्या नावे करा. ज्या गायरान, गावठाण व सरकारी जमिनीवर घरे आहेत, ती घरे व घराची तळ जमीन राहात असणाऱ्याच्या नावे करावे अशी मागणी करण्यात आली होती. याबाबत एक समिती गठीत केली असल्याची घोषणा शिंदे यांनी केली. या समितीत किसान सभेचे नेते, माजी आमदार जे. पी. गावित आणि आमदार विनोद निकोले हे सदस्य असणार आहेत.

एका महिन्यात ही समिती निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. विधवा पेन्शन योजनेतील अट शिथिल होणार आहे. त्यासाठीचे वयोमर्यादा ४० पर्यंत करण्याची मागणी होती. त्याबाबत आढावा घेऊन कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती शिंदे यांनी दिली.

### आंदोलनात प्रामाणिकता दिसून आली...

लाँग मार्चच्या आंदोलनात कोणतेही राजकारण नव्हते. त्यात प्रामाणिकता होती, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले. शेतकरी आणि आदिवासींच्या हक्काबाबतच्या मागण्या होत्या. राज्य सरकारकडून या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून शनिवारपासून तातडीने अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## शहरात मिळकतकराची धडक वसुली मोहीम जोरात

- सहा थकबाकीदारांचे केले गाळे सील
- १ कोटी रुपयांची कर वसुली

**सोलापूर**: महापालिकेच्या विशेष पथकाकडून मालमत्ता कराची धडक वसुली, सील व जप्तीची कारवाई मोहीम जोरात सुरू आहे. दरम्यान, शुक्रवारी विविध वसुली पथकाकडून ६ थकबाकिदारांचे गाळे सील करण्यात आले तर विविध १६ मिळकतदारांकडून थकबाकीपैकी १० लाख ६३ हजार २३३ रुपये वसुली करण्यात आली. एकूणच शुक्रवारी थकबाकी पैकी ३० लाख रुपये, चालू करापैकी ५७ लाख रुपये, चेकद्वारे २१ लाख रुपये असे एकूण एकाच दिवशी १ कोटी ८ लाख रुपये वसुली केल्याची माहिती महापालिकेच्या उपायुक्त विद्या पोळ यांनी दिली.

शुक्रवारी विविध पेठांमधून थकबाकी वसुली व जप्तीची मोहीम हाती घेण्यात आली. यामध्ये सिव्हील, गुरुवार पेठ, ६३ पेठ, मुरारजी पेठ, गोल्डफिंच पेठ, ६८ पेठ, बुधवार पेठ, उत्तर कसबा, लक्ष्मी पेठ आदी पेठांमधील १६ मिळकतदारांकडून त्यांच्या १६ लाख ९४ हजार ५०० रुपये एकूण थकबाकी पैकी आज १० लाख ६३ हजार २३३ रुपये कर वसुली करण्यात आली आहे. थकबाकी वसुली पोटी आर्मी कार्पोरेशन, उमाकांत देविदास पवार, शिवाजी गोविंद चव्हाण, सौ. सरस्वती शिवन्ना हुंडेकरी (भोग.), चंद्रकांत गुरुसिद्ध हप्पा या सहा थकबाकिदारांचे गाळे सील करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

### सुट्टी दिवशीही कर भरणा सुरूच राहणार

नागरिकांच्या सोयीसाठी शनिवारी व रविवारी सुट्टी दिवशीही त्या त्या कार्यालयात कर भरण्याची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच सोलापूर महापालिकेच्या वतीने कर वसुलीची व जप्तीची कारवाई मोहीम सुट्टी दिवशीही सुरूच राहणार असल्याचे महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.


## राहुल-जडेजाची धमाल, ऑस्ट्रेलियावर पाच विकेट्सने विजय

**मुंबई** : सिराज आणि शामी यांच्या धारधार गोलंदाजीपुढे कांगारुंनी लोटांगण घातले होते.

ऑस्ट्रेलियाचा डाव अवघ्या १८८ धावांत संपुष्टात आला होता. पण प्रत्युत्तर दाखल भारतीय संघाची सुरुवातही खराब झाली होती. पण केएल राहुलचे अर्धशतक आणि रविंद्र जाडेजाची संयमी खेळीच्या बळावर भारताने पहिल्या वनडे सामन्यात पाच विकेट्सने विजय मिळवला आहे. या विजयासह भारताने तीन सामन्याच्या वनडे मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियाने दिलेल्या १८९ धावांच्या आव्हान भारताने पाच विकेट्स शिल्लक ठेवत पार केले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सध्याच्या कोरोनाच्या न्यूज पाहता आमची परीक्षा होईल? असं वाटतं?

कल्याण
567-89-450
मेन बाजार
399-13-337

## उजनीतील गाळ काढण्यासाठी एक ते दीड महिन्यात निविदा काढणार

- आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या लक्षवेधीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उत्तर

सुराज्य/सोलापूर

सन २०१७ साली राज्यातील ५ मोठ्या धरणातील गाळ काढण्यासंदर्भातील धोरण ठरविण्यात आले होते.परंतु काही कारणांमुळे अंमलबजावणी होऊ शकली नाही. परंतु आता गाळ निष्कासन कामाकरिता मानक निविदा कागदपत्रे तयार करण्यासाठी नेमलेल्या समितीचा सुधारित अहवाल प्राप्त झाल्यानंतर एक ते दीड महिन्यात उजनीतला गाळ कढण्यासंदर्भातील निविदा काढण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात उजनी धरणातील गाळ काढून पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी लक्षवेधी उपस्थित करून उजनी धरणातील गाळाची वस्तुस्थिती विशद करत धरणातील गाळ काढण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याची मागणी केली. महाराष्ट्रातील एक मोठे धरण म्हणून उजनीची ओळख आहे,या धरणाचे काम १९८० साली पूर्ण झाले. उजनीचे पाणलोट क्षेत्र १४८५६ चौ. कि.मी. असून एकूण पाणीसाठा क्षमता ११७.२३ टीएमसी असून मृत साठा ६३.६५ टीएमसी तर उपयुक्त साठा ५३.५८ टीएमसी एवढा आहे.धरणाचे बांधकाम होऊन ४३ वर्षं पूर्ण झाली आहेत. उजनी धरणामध्ये वरच्या भागातील १८ धरणातील पाण्याबरोबर व पावसाच्या पाण्याबरोबर गाळ येत आहे.

आ.मोहिते-पाटील यांनी उजनी धरणातील गाळाची वस्तुस्थिती विशद करताना सांगितले की नाशिक येथील



मेरी व केंद्र सरकारच्या तोजो विकास इंटरनॅशनल संस्थेच्या अहवालानुसार उजनीत १३% गाळ आहे असे स्पष्ट झाले आहे. त्यानुसार ९० कोटी ब्रास वाळू व ६० कोटी ब्रास गाळ धरणात आहे असे दिसून येते. हा गाळ काढल्यानंतर उजनी धरणात ६.५% टीएमसी एवढा पाणी साठा वाढणार आहे. जिल्ह्याला एक आवर्तनासाठी तेवढे पाणी लागते.उजनी धरणातील वाळूची किंमत ५१,००० कोटी रुपये असल्याचे सेंट्रल वॉटर कमिशनच्या अहवालानुसार दिसून येते.तेवढा महसूल महाराष्ट्र शासनास वाळूच्या माध्यमातून मिळू शकतो.तसेच शेतकऱ्यांना आपल्या शेतात टाकण्यासाठी गाळ उपलब्ध होणार आहे.

१९७७ साली केंद्रीय जल आयोगाने केलेल्या अभ्यासानुसार उजनीचे live storage 1517 Million cubic metre (द.ल.घ.मी) असल्याचे अहवालातुन स्पष्ट झाले होते.२०१८ साली पुन्हा केंद्रीय जल आयोगाने राज्यातील धरणांचा अभ्यास केला तेव्हा उजनीचे live storage 1328.89 Million cubic metre (द.ल.घ.मी) असल्याचे अहवालातुन समोर आले आहे. सन १९७७ आणि २०१८ च्या अहवालांचा विचार करता उजनीचे १८८.३०६ Million cubic metre(द.ल.घ.मी) live storage कमी झाल्याचे सिद्ध होते. म्हणजेच tmc मधे live storage ६.५० tmc नी कमी झाले आहे. उजनीच्या कालव्यां दवारे एक आवर्तन देण्यासाठी सुमारे ६ tmc पाणी लागते.जल आयोगाच्या आकडेवारीचा विचार करता उजनीच्या कालव्यादवारे दिल्या जाणाऱ्या एका आवर्तनाचे पाणी गाळामुळे कमी झाले आहे.